# बोंड अळीच्या पंचनाम्यासंबंधी खानदेशात कार्यवाही अपूर्ण

## कपाशीचे ९० टक्के क्षेत्र रिकामे; जी व एच अर्जांचे आकडे मिळेनात

**जळगाव (प्रतिनिधी) :** धुळ्यासह जळगाव जिल्ह्यात कपाशीवरील गुलाबी बोंड अळीच्या पंचनाम्यासंबंधी कार्यवाही अपूर्ण आहे. या दोन्ही जिल्ह्यांमधील पूर्वहंगामीसह कोरडवाहू कपाशीचे पीक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या आवाहनानंतर नष्ट केले. सुमारे ९० टक्के पीक नष्ट झाले. शेतात पीक नाही, मग पंचनामे अपूर्ण कसे, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

बोंड अळीचा प्रकोप ऑक्टोबरमध्येच वाढला. नंतर नोव्हेंबरमध्ये रोगग्रस्त पूर्वहंगामी कपाशीचे पीक काढायला सुरवात झाली. आजघडीला कोरडवाहू कपाशीचे पीकही संपले आहे. धुळे व जळगाव मिळून सुमारे सात लाख हेक्टरवर कपाशीची लागवड झाली असून, त्यात जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक चार लाख ७५ हजार हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. सात लाख हेक्टरमध्ये जळगाव जिल्ह्यात सुमारे एक लाख २० हजार हेक्टरवर पूर्वहंगामी, तर धुळ्यात सुमारे ५० हजार हेक्टरवर पूर्वहंगामी कपाशीची लागवड झाली होती. तापीकाठालगतच्या रावेर, यावल, मुक्ताईनगर, चोपडा, जळगाव, अमळनेर, शिरपूर व शिंदखेडा तालुक्यांमध्ये पूर्वहंगामी कपाशी अधिक होती. हे क्षेत्र महिनाभरापूर्वीच रिकामे झाले आहे. या रिकाम्या झालेल्या क्षेत्राचे पंचनामे झाले, की नाहीत याचा संभ्रम शेतकऱ्यांमध्ये किंवा कपाशी उत्पादकांमध्ये आहे. कारण कृषी विभागाचे कर्मचारी म्हणतात, जी अर्ज दिला असेल तर चिंता करू नका तर दुसरीकडे पंचनामे गरजेचे आहेत, असे तलाठी कार्यालयातून सांगितले जाते.



> गुलाबी बोंड अळीचे पंचनामे सुरूच असल्याचे म्हटले जाते, पण हे कर्मचारी केव्हा व कुठे आले हे समजलेच नाही. आम्ही जे जी अर्ज दिले त्याची दखल घेऊन आम्हाला नुकसानभरपाई मिळावी.
>
> **– नाना पाटील,** शेतकरी, बोदवड (जि. जळगाव)

### जी व एच अर्ज किती आले?

**कपाशी नुकसानीच्या तक्रारींसाठी जी अर्ज व पंचनाम्यांसाठी एच अर्ज भरून कार्यवाही केली जात आहे. अशात शेतकऱ्यांनी मध्यंतरी जी अर्ज भरून ते तालुक्याच्या ठिकाणी जाऊन कृषी विभागात जमा केले. हे जी अर्ज आता नुकसानभरपाई देताना गृहीत धरतील काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच एच अर्जानुसार किती पंचनामे झाले याची माहितीही कृषी विभागात मिळत नसल्याची माहिती मिळाली. या अर्जांसंबंधीची जबाबदारी जिल्हा गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडे असून, ते समन्वयक म्हणून काम करीत असल्याची माहिती मिळाली.**

महसूल व कृषी विभाग संयुक्तपणे काम करीत नसल्याने पंचनाम्यांचा गोंधळ वाढत आहे. जळगाव जिल्ह्यात पंचनामे पूर्ण व्हायला अजून १० ते १२ दिवस लागतील, तर धुळ्यातही अशीच स्थिती असल्याची माहिती मिळाली.

# सिंदखेडराजा येथे उद्या जिजाऊ जन्मोत्सव सोहळा



**बुलडाणा (प्रतिनिधी) :** मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे शुक्रवारी (ता. १२) राष्ट्रमाता माँ जिजाऊ जन्मोत्सवाचा सोहळा होणार असून, याची तयारी अंतिम टप्प्यात पोचली आहे. या वर्षी जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याला साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले, छत्रपती इंजिनिअर बाबाजीराजे भोसले (तंजावर, तामिळनाडू) आणि कोल्हापूरचे खासदार छत्रपती युवराज संभाजीराजे भोसले उपस्थित राहणार आहेत.

जिजाऊ जन्मोत्सवाच्या सोहळ्यासाठी सिंदखेडराजा येथील जन्मस्थळी विविध कार्यक्रम होणार आहेत. शुक्रवारी सूर्योदयी राजवाड्यावर महापूजा केली जाईल. या वेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उमाताई तायडे यांच्या हस्ते व आमदार शशिकांत खेडेकर यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण केले जाईल.

सिंदखेडराजा येथे मराठा सेवा संघातर्फे १९९४ पासून या सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. सिंदखेडराजा शहरातील जिजाऊ सृष्टीवर लाखो जिजाऊ भक्तांच्या उपस्थितीत या वर्षीचा सोहळा होणार आहे. सिंदखेड राजा येथे ३ जानेवारीपासून जिजाऊ सृष्टीवर सावित्री-जिजाऊ दशरात्रोत्सव सुरू आहे. शुक्रवारी (ता. १२) दशरात्रोत्सवाचा समारोप होईल. गुरुवारी (ता. ११) जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला सायंकाळी लखुजीराजे जाधव यांच्या राजवाड्यावर दीपोत्सव होणार आहे. राजवाडा परिसरात दीप लावले जाणार आहेत.

# नाशिक बाजार समिती बरखास्तीला स्थगिती

**नाशिक (प्रतिनिधी) :** नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी उच्च न्यायालयात सहकार खात्याने पाठविलेल्या नोटिशीच्या विरोधात दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी होऊन संचालक मंडळाला आणखी एक महिन्यांचा दिलासा मिळाला. बाजार समिती बरखास्त झाल्यानंतर संचालक मंडळाला न्यायालयात दाद मागण्यासाठी प्रशासकांनी पुरेसा वेळ द्यावा, ही प्रमुख मागणी न्यायालयाने मान्य करून एक प्रकारे बरखास्तीच्या कारवाईला स्थगिती दिली.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकूणच कारभाराच्या विरोधात सहकार खात्याने चालविलेल्या चौकशीच्या आधारे गेल्या आठवड्यात सहकार आयुक्तांनी बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करून त्यावर अनिल चव्हाण यांची प्रशासक म्हणून नेमणूक केली आहे. बाजार समितीच्या १९९५ पासूनच्या कारभारात महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे थकीत कर्ज, राज्य सहकारी बँकेचे थकीत कर्ज, कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी, निलंबित कर्मचाऱ्यांच्या वकील फी खर्च, जाहिरातबाजीवर केलेला अनावश्यक खर्च, रोजंदारी कर्मचाऱ्यांची अनावश्यक भरती यांसह दहा मुद्द्यांवर जिल्हा उपनिबंधकांनी बाजार समितीच्या विद्यमान संचालकांना कलम 45 नुसार नोटीस बजावली होती.

या नोटिशीच्या विरोधात गेल्या वर्षीच संचालकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. पूर्वीच्या संचालकांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयासाठी विद्यमान संचालकांना दोषी धरणे चुकीचे व अन्यायकारक असल्याची बाजू मांडली होती.

www.agrowon.com
ताज्या बातम्यांसाठी पाहा...







